**प्रेस नोट** **दि.३१/०३/२०१९**

## दत्तवाडी पो.स्टे.पुणे

## लॅपटॉप चोरणा-या अल्पवयीन मुलास पोलीसांनी घेतले ताब्यात व लॅपटॉप केला हस्तगत

दि.२२/०३/२०१९ रोजी पोलीस उपनिरिक्षक, कुलदिप संकपाळ व स्टाफ असे दत्तवाडी पोलीस ठाणे पुणे येथे हजर असताना पो.ना.सोमेश्वर यादव यांना त्यांचे खास बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, अण्णाभाऊ साठे वसाहत अरण्येश्वर,पुणे येथील एक मुलगा त्याचेकडे असणारा चोरीचा लॅपटॉप घेवुन तो विकण्यासाठी गजानन महाराज चौकात आलेला आहे. त्याने अंगात काळया व निळया रंगाचा टि शर्ट घातलेला असुन काळी ट्रॅक पॅन्ट घातलेली आहे. तो सडपातळ असुन त्याचे केस वाढलेले व पांढरा कलर केलेले आहेत. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने त्यांनी सदरची बातमी ही पोलीस उप-निरिक्षक,कुलदिप संकपाळ यांना कळविली असता,त्यांनी ती वरिष्ठांना कळवुन त्यांचे मुफजल आदेशाप्रमाणे बरोबरील स्टाफसह साध्या वेशात तत्काळ गजानन महाराज चौक येथे जावुन पाहणी केली असता,तेथे चित्रा चिकन सेंटरचे समोरील पानटपरी जवळ मिळालेल्या बातमीतील वर्णनाचा मुलगा हातात एक लॅपटॉप घेवुन उभा असलेला पोलीसांना दिसला त्यावेळी त्यांची खात्री होताच त्यांनी १०/०० वा.चे सुमारास त्या मुलाकडे जावुन त्यास त्यांची ओळख करुन देवुन,त्यास त्याचे नाव व पत्ता विचारता त्याने त्याचे नाव प्रथमेश ज्ञानेश्वर पवार,वय १७ वर्षे १० महीने,रा. अणाभाऊ साठे वसाहत, ५४/२,अरण्येश्वर,पुणे असे असल्याचे सांगीतले. त्यावेळी त्याचेकडे असणारा लॅपटॉप कोणाचा आहे तसेच त्याची खरेदी केल्याची पावती त्याचेकडे आहे काय याबाबत पोलीसांनी त्यास विचारणा केली असता प्रथम त्याने उडवा-उडवीची उत्तरे दिली. नंतर त्यास विश्वासात घेवुन त्याचेकडे तपास केला असता,त्याने सदरचा लॅपटॉप हा दि. १४/०३/२०१९ रोजी रात्रौ पुणे सातारा रोड येथील मॅकडोनाल्ड हॉटेलचे समोर पार्क केलेल्या ज्युपीटर गाडीचे डिक्कीतुन काढुन चोरी केला होता व आज तो विकण्यासाठी येथे आणला आहे. असे पोलीसांना सांगीतले त्यावेळी त्याचेकडील लॅपटॉपची पोलीसांनी पाहणी केली असता सदरचा लॅपटॉप हा सोनी विवो कंपनीचा असल्याचे समजले त्यावेळी पोलीसांनी बाल अपचारीने लॅपटॉप चोरलेल्या ठिकाणावरुन व लॅपटॉपचे वर्णनावरुन दत्तवाडी पोलीस ठाणेकडील अभिलेखाची पडताळणी केली असता सदर वर्णनाचा लॅपटॉप हा वरील ठिकाणावरुन चोरीस गेले बाबतची तक्रार दत्तवाडी पोलीस ठाणे येथे दि. १५/०३/२०१९ रोजी दाखल असुन त्याबाबत दत्तवाडी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल आहे म्हणुन त्यास ताब्यात घेण्यात आले आहे.

सदरची कारवाई ही दत्तवाडी पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक देविदास घेवारे व पोलीस निरिक्षक (गुन्हे) राजेंद्र सहाणे यांचे मार्गदर्शना खालीतपास पथकाचे प्रभारी पोलीस उपनिरिक्षक कुलदिप संकपाळ व पो. हवा. रविंद्र फुलपगारे, पो. हवा. तानाजी निकम, पो हवा श्रीकांत शिरोळे, पो. ना. सुधीर घोटकुले, पो. ना. महेश गाढवे, पोना सोमेश्वर यादव, पोना कुनाल माने, पो शि शरद राऊत, पो शि विकास कदम, पो शि सागर सुतकर, पो शि शिवाजी क्षीरसागर, पो. शि. राहुल ओलेकर, पो शि अमित सुर्वे, पो शि अक्षय कुमार वाबळे व पो शि अमोल लोहार पो शि आदिनाथ देवकर यांनी केला आहे. तसेच दाखल गुन्हयाचा पुढील तपास हा पोलीस उपनिरिक्षककुलदिप संकपाळ हे स्वतः करीत आहेत.

(देविदासघेवारे)
वरिष्ठ पोलीसनिरीक्षक
दत्तवाडी पो.स्टे. पुणे शहर